महसूल व वन विभाग

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव**

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगाव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले :-** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144
4. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 04 एप्रिल, 2021, दिनांक 05 एप्रिल, 2021, दिनांक 13 एप्रिल, 2021 , दिनांक 20 एप्रिल, 2021, दिनांक 21 एप्रिल, 2021 व दिनांक 29 एप्रिल, 2021
6. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2021/685, दिनांक 14 एप्रिल, 2021
7. या कार्यालयाचा आदेश क्र. दंडप्र-01/कावि/2021/706, दिनांक 20 एप्रिल, 2021
8. या कार्यालयाचा आदेश क्र. दंडप्र-01/कावि/2021/711, दिनांक 22 एप्रिल, 2021

---0000---

क्र दंडप्र-01/कावि/730/2021 दिनांक 30 एप्रिल, 2021

# आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 13 एप्रिल, 2021 अन्वये या कार्यालयाचे आदेश दिनांक 14 एप्रिल, 2021 नुसार संपूर्ण जळगाव जिल्हयासाठी दिनांक 14 एप्रिल, 2021 रोजी रात्री 08.00 वाजेपासून ते दिनांक 01 मे, 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपावेता फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 सह विशेष निर्बंध लागू करण्यात आलेले आहेत. तसेच उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 20 एप्रिल, 2021 नुसार या कार्यालयाचे दिनांक 20 एप्रिल, 2021 अन्वये सुधारीत विशेष निर्बंध लागू करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 21 एप्रिल, 2021 अन्वये, दिनांक 22 एप्रिल, 2021 रोजी रात्री 08.00 वाजेपासून दिनांक 01 मे, 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपावेतो संचारबंदीसह सुधारीत विशेष निर्बंध लागू करण्यात आलेले असून सदरचे निर्बंध उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 29 एप्रिल, 2021 अन्वये दिनांक 15 मे, 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपावेतो वाढविण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, मी **अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005, भारतीय साथरोग अधिनियम, 1897 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **या कार्यालयाचे उपोद्घातात नमूद आदेश दिनांक 22 एप्रिल, 2021 अन्वये संपूर्ण जळगांव जिल्ह्याकरीता लागू करण्यात आलेले संचारबंदीसह विशेष निर्बंध दिनांक 15 मे, 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपावेतो वाढविण्याबाबत आदेश पारीत करीत आहे.**

**दिनांक 22 एप्रिल, 2021 रोजीच्या आदेशानुसार लागू करण्यात आलेल्या निर्बंधांचे पालन होत आहे किंवा नाही याची जबाबदारी संयुक्तरित्या पोलीस विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांची राहील.**

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 व फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 मधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 30 /04/2021 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी
जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगाव**

प्रत :- **माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव
3. पोलीस अधिक्षक जळगाव
4. आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका जळगाव
5. कुलसचिव, क.ब.चौ. उ.म.वि जळगाव
6. उपविभागीय दंडाधिकारी सर्व / कार्यकारी दंडाधिकारी सर्व
7. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगाव
8. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव
9. उपअभियंता, एमआयडीसी जळगाव
10. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगाव
11. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जळगाव
12. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि प जळगाव
13. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र जळगाव
14. मुख्याधिकारी सर्व
15. सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन ,जळगाव
16. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,जळगाव
17. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ जळगाव

प्रत :- **जिल्हा माहिती अधिकारी जळगाव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

प्रत :- **जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगाव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.